# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./२४८६ /२०२२ दि. १८ /०७/२०२२

## परिपत्रक

विषय:- विभागीय सहसंचालक यांचे कार्यालयास भेटी देत असताना करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. ममअ-ब/२०२२/परिपत्रक/प्रशा-१/७३६०, दि. ०७/०७/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बहुतांश शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी दिवसभर तसेच वारंवार सहसंचालक कार्यालयात उपस्थित असतात. सदर उपस्थितीबाबत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांची पुर्वपरवानगी देखील घेतलेली नसते. त्यामुळे अध्यापनावर विपरित परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

त्यामुळे संदर्भिय परिपत्रकान्वये सर्व विभागीय सहसंचालक तसेच प्राचार्य /कुलसचिव (अधिनस्त महाविद्यालये / विद्यापीठे) यांना खालीप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे.

**१. विभागीय सहसंचालक कार्यालयाशी संबंधित कामकाजासाठी महाविद्यालय / विद्यापीठातील एक कर्मचारी/ अधिकारी यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी.**

**२. संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना महाविद्यालय / विद्यापीठ यांनी ओळखपत्र पुरवावे.**

**३. महाविद्यालय / विद्यापीठ यांच्या दैनंदिन शासकीय कामकाजासाठी केवळ ओळखपत्र धारण करणारी व्यक्तीच संबंधित प्राचार्य / कुलसचिव यांच्या पुर्वपरवानगीनेच विभागीय सहसंचालक कार्यालयात उपस्थित राहील, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच अत्यावश्यक कामकाजासाठी इतर शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विभागीय सहसंचालक कार्यालयात उपस्थित राहणे अत्यावश्यक असल्यास प्राचार्यांनी संबंधित कर्मचाऱ्याला तसे पत्र द्यावे.**

**४. सदर व्यक्तीने सहसंचालक कार्यालयात उपस्थितीबाबत Visit Book वर नोंद ठेवावी.**

**५. या व्यतिरिक्त महाविद्यालयाचे इतर शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचारी विभागीय सहसंचालक कार्यालयात उपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विभागीय सहसंचालक तसेच प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल.**

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

१८/७/२०२२

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 2364 दि. 8/7/22
जावक क्र. ........ दि. ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 6557 दि.
जावक क्र. 6557 दि. 8/7/22

## महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१


Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११११५३


क्रमांक : ममअ-ब/२०२२/परिपत्रक/प्रशा-१ 6380 दिनांक ०७.०७.२०२२

7 JUL 2022

**परिपत्रक :**

संचालनालयाचे असे निदर्शनास आले आहे की, विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बहुतांश शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी दिवसभर तसेच वारंवार सहसंचालक कार्यालयात उपस्थित असतात. सदर उपस्थितीबाबत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांची पूर्वपरवानगी देखील घेतलेली नसते. त्यामुळे अध्यापनावर विपरीत परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. अशा अध्यापकांचे आवश्यक असलेले १८० वार्षिक शिकवण्याचे दिवस (Teaching Days) कसे पूर्ण होतात? हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. विभागीय सहसंचालक देखील ही बाब गांभीर्याने घेत नाहीत असे दिसून येते.

सदर परिपत्रकाद्वारे सर्व विभागीय सहसंचालक तसेच प्राचार्य / कुलसचिव (अधिनस्त महाविद्यालये / विद्यापीठे) यांच्या निदर्शनास आणण्यात येते की, विभागीय सहसंचालक कार्यालयांशी संबंधित कामकाजासाठी आपले महाविद्यालय / विद्यापीठातील एका कर्मचारी / अधिकारी यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी. संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना महाविद्यालय / विद्यापीठ यांनी ओळखपत्र पुरवावे. महाविद्यालय / विद्यापीठ यांच्या दैनंदिन शासकीय कामकाजासाठी केवळ ओळखपत्र धारण करणारी व्यक्तीच संबंधित प्राचार्य / कुलसचिव यांच्या पूर्वपरवानगीनेच विभागीय सहसंचालक कार्यालयात उपस्थित राहील, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच अत्यावश्यक कामकाजासाठी इतर शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना विभागीय सहसंचालक कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक असल्यास प्राचार्यांनी संबंधित कर्मचाऱ्याला तसे परवानगी पत्र द्यावे. सदर व्यक्तीने सहसंचालक कार्यालयात उपस्थितीबाबत Visit Book वर नोंद ठेवावी. या व्यतिरिक्त महाविद्यालयाचे इतर शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी विभागीय सहसंचालक कार्यालयात उपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विभागीय सहसंचालक तसेच प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

DR (ESH) Pl. issue circular separately for affiliated colleges and for university 8.7.2022

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण)
  २/- सदर बाब आपल्या अधिनस्त महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावी.
२. सर्व कुलसचिव (अकृषि विद्यापीठे)
३. सर्व प्राचार्य (अशासकीय अनुदानित महाविद्यालये)

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव.

E:\Hemant\Paripatrak.docx

11.7.2022